तरुण भारत
सोमवार, १४ फेब्रुवारी २०२२

# शेतकऱ्याच्या शस्त्रक्रियेसाठी 'रवळनाथ'कडून मदतीचा हात



चव्हाणवाडी : येथील शेतकरी आनंदा हासबे यांना वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदत करताना एम. एल. चौगुले. यावेळी डी. के. मायदेव व इतर.

**आजरा :** येथील रवळनाथ को–ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीच्यावतीने चव्हाणवाडी येथील शेतकरी आनंदा हासबे यांच्या मणक्याच्या शस्त्रक्रियेसाठी १५ हजारांची आर्थिक मदत करत सामाजिक बांधिलकी जपली. रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या हस्ते हासबे व त्यांच्या पत्नी सुरेखा हासबे यांच्याकडे रोख रक्कम सुपुर्द करण्यात आली. गवताचा भारा डोक्यावरून आणताना पडल्यांने हासबे यांच्या मणक्याला मार बसला आहे. ते गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्या मणक्याची शस्त्रक्रिया करणे गरजेचे आहे. यांची दखल रवळनाथ हौसिंगने घेत सामाजिक बांधिलकी जपली आहे. यावेळी रवळनाथचे संचालक प्रा. आर. एस. निळपणकर, महेश मजती, मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, प्रा. रमेश चव्हाण उपस्थित होते.